# संपादकीय

**प्रा. धनराज तोताराम धनगर,**
**साहाय्यक प्राध्यापक,**
**मराठी विभाग,**
**महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,**
**मालेगाव कॅम्प, जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत.**

**नमस्कार !**

**Research Journey Multidisciplinary International E-Research Journal** च्या या बहुचर्चित वेबपोर्टलवर आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत ! **'Research Journey'** च्या तिसऱ्या वर्षातील हा तिसरा अंक आम्ही **'मराठी साहित्य-संशोधन विशेषांक'** म्हणून मराठी भाषा आणि साहित्याला समर्पित करीत आहोत. मराठीतील साहित्य लेखनाची आणि संशोधनाची परंपरा फार जुनी आहे. काळानुरूप माध्यमांचा खुबीने वापर करण्यातदेखील मराठी साहित्यिक अग्रेसर राहिलेले आहेत. शिलालेख, ताम्रपत्र, भूर्जपत्र, ताडपत्र, पासोडी, विविध धातू पत्रावरील हस्तलेखन लाकडावरील हस्तलेखन, कागदावरील हस्तलेखन ते छपाईच्या अत्याधुनिक साधनांचा वापर मराठीतील सृजनशील लेखनाला बहारदार आणि धारदार स्वरूप प्राप्त करून देणारा ठरलेला आहे. काळानुरूप मराठी साहित्याने स्वीकारलेले हे बदल लेखकाच्या अभिव्यक्तीला अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहचविण्यासदेखील साहाय्यभूतच ठरलेले दिसतात. हे येथे सांगण्याचं प्रयोजन हेच की, सध्याच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगाची पावले ओळखण्याची ही क्षमता आजच्या आमच्या या नव्या पीढीतील साहित्यिक आणि संशोधकांमध्येही दिसते आहे. माहिती तंत्रज्ञनाचा उपयोग संशोधनासाठी व्हावा, जगातील अधिकाधिक ज्ञानी, जाणकारांपर्यंत, आपले संशोधन पोहचावे हा सद्हेतू ठेवूनच आम्ही आपल्या संशोधनाच्या प्रवासातील सहप्रवासी बनून आपल्यासोबत मार्गक्रमण करीत आहोत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आंतरविद्याशाखीय संशोधकांसोबत, तज्ञासोबत **Research Journey Multidisciplinary International E-Research Journal** च्या माध्यमातून हा सुखद सहप्रवास जानेवरी २०१४ पासून सुरू आहे आणि यशस्वीतेचे एक-एक शिखर सर करत ही वाटचाल अखंड चालू राहणार आहे. नुकताच या अंकाला **Impact Factor – 3.452** असा मिळालेला आहे. ही आपण जोपासलेल्या मूल्यनिष्ठतेची आणि लेखांच्या गुणवत्ततेतची पावतीच म्हणावी लागेल.अर्थातच याचे श्रेय आपल्यासारख्या सर्जनशील संशोधकांनाच आहे.

**रिसर्च जर्नी**च्या या अंकात महाराष्ट्राच्या विविध भागातील संशोधक, विचारवंतांचे लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. डॉ. अंजली मास्कॅरेन्हास, प्रा. विपीन वैराट, डॉ. निशा जोशी यांचे लोकसाहित्यावरील संशोधनात्मक लेख निश्चितच स्पृहणीय महणावे लागतील. लोकसाहित्याच्या संशोधनात सर्वेक्षण आणि संकलनाद्वारे मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण महत्त्वाचे ठरते. दुय्यम साधनांऐवजी प्राथमिक साधनांवर आधारीत संशोधन हेच महत्त्वाचे मानले जाते. उपरोक्त अभ्यासकांनी ही प्राथमिकता लक्षात घेतेलली आहे.

प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांचा तेराव्या शतकातील मराठी भाषा, व्याकरण व शब्दसंग्रह हादेखील असाच विश्लेषणात्मक शोधआलेख आहे. तत्कालीन भाषेचे स्वरूप व त्यातील बदल व याभाषेचे व्याकरण समजावण्यात ते यशस्वी झालेले आहेत. प्रा. अनिल भगत आणि प्रा. इंद्रायणी सैंदाणे यांचे महानुभावीय संप्रदाय आणि साहित्याविषयीचे संशोधनपर लेख या संप्रदायाच्या कार्यावर व साहित्यनिर्मितीच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारे आहेत. प्रा. संगीता सूर्यवंशी, डॉ. मंगल डोंगरे, डॉ. राजेंद्र सलालकर यांचे संत साहित्यावरील लेखदेखील अभ्यासपूर्ण आहेत. एकुणच संत साहित्याचा आजवर झालेला मोठ्याप्रमाणावरील अभ्यास लक्षात घेता संत साहित्यातून नाविन्याचा शोध घेणे तसे मोठे महाकठीण आहे. तथापि मांडणीचे वेगळेपण व आपल्याला जाणवणारे नाविन्य मांडण्याचा प्रयत्न या अभ्यासकांचा दिसून येतो. संत साहित्यासोबतच मध्ययुगीन

काळात महत्त्वपूर्ण ठरलेले शाहीरी वाङ्मय व बखर वाङ्मय यावरील प्रा. रेखा इंगोले आणि डॉ. नितीश सावंत यांचे लेख देखील याच स्वरूपाचे म्हणता येतील सैध्द्धांतिक स्वरूपाची मांडणी करण्याचा प्रयत्न या अभ्यासकांचा आहे. तथापि परिचयात्मक स्वरूपाचेच हे लेख म्हणावे लागतील.

साठोत्तरी साहित्याच्या संदर्भात दलित साहित्य व ग्रामीण साहित्य हे दोन साहित्य प्रवाह प्रभावी ठरलेले दिसतात. दलित साहित्याच्या अनुषंगाने डॉ. रामदास रसाळ सांचा दलित कादंबरीची वाटचाल हा कांदंगरी वाङ्मयाची इतिहास स्वरूपाची मांडणी करणारा लेख आहे. तर डॉ. अरूणा मोरे यांनी शिवराम जानबा कांबळे यांचे कार्य हा व्यक्ती परिचयात्मक लेख वाचनीय झाला आहे. व्यक्ती परिचयात्मक स्वरूपाचा डॉ. भालचंद्र फडके यांच्यावरील डॉ. अरूण लाडे यांचा लेख  तसेच कविता महाजन व त्यांच्यासाहित्याचा आढसवा घेणारा डॉ. दिलीप पवार यांचा लेखदेखील अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या मांडणीमुळे वाचनीय व रसपूर्ण म्हणता येईल.  यासोबतच प्रा. माधवी पवार यांचा ग्रामीण साहित्याची चळवळ, डॉ. मिनाक्षी पाटील यांचा जागतिकिकरणाचा स्त्री जीवनावरील परिणाम, सौ माधुरी बुधकर यांचा जागतिकिरण आणि भारत, समति जाधव यांचा दलित कविता एक अभ्यास हे लेख साहित्य आणि सामाजिक बदल, सामाजिक चळवळी यांचे संबंधाचे श्लिेषण करणारे आहेत. साहित्यकृतींची समीक्षा करणाऱ्या लेखांत प्रा. नरेश महाजन यांनी केलेले उपराचे समीक्षण, प्रा. लीना केदारे यांनी प्रशांत दळवींच्या 'चाहूल' या नाटकाचा घेतलेला आढावा, विष्णू राठोड यांनी गोठण या रावजी राठोड यांच्या कादंबरीतून घेतलेलो बंजारा गोलीचा शोध, डॉ. अन्नपूर्णा चौधरी यांनी उत्तम बंडे तुपे यांच्या 'खाइ'चे केलेले विश्लेषण वाचकांना या साहित्यकृतींकडे आकर्षित करण्यास सक्षम ठरतील असे दिसते.  डॉ. भारती नवथर यांचा 'संशोधन पध्दती भाषा व तळटीपा' आणि प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांचा नाटकाचे अध्यापन हे दोन लेख प्राथमिक स्त्रोतावर आधारित आणि अध्यापन व संशोधनाच्या क्षेत्रात वावरणाऱ्यांना मार्गदर्शक ठरणारे असेच आहेत.  नवोदित आणि मातब्बर अशा संशोधकांना एकत्र विचारमंच उपलब्ध करून देणे हे रिसर्च जर्नीचे सुरूवातीपासूनचे ध्येयधोरण निश्चितच राहिले आहे. याही अंकात आपणास याचा प्रत्यय येईल. लिहिणाऱ्यांचे मनोबल वाढविणे त्यांना लिहिते ठेवणे हेच या नियतकालिकांच्या प्रपंचामागील मुख्य कारण आहे. जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्याचे प्रयत्न आपले निश्चितच सुरू राहणार आहेत. अर्थातच आपल्या सहकार्याची आणि सकारात्मक विचारांची आणि पाठिंब्याची आवश्यकता आहे त्याशिवाय हे व्रत इतिहास निर्माण करण्यात अयशस्वी ठरेल. विविध विद्यापीठांमधील संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक बंधुभगिनींनी आपल्या  या जर्नलविषयीची माहीती आपल्या विद्यापीठाला पाठवावी व यु.जी. सी.च्या नवीन यादीत व विद्यापीठांच्या यादीतही समावेशीत करण्याचा आग्रह धरावा. प्रशासकीय पातळीवर आमचेही प्रयत्न त्यासंदर्भात सुरू आहेतच .

मी या विशेषांकासाठी निवडलेल्या लेखांच्या लेखकांचे, संशोधकांचे विशेष अभिनंदन करतो, आपल्या भावी संशोधनास शुभेच्छा देतो. आमच्या संपादक मंडळाचा, विषयतज्ञांचा आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांचा ऋणाईत असण्यातच मला धन्यता आहे. अर्थातच या सर्वांशिवाय आणि आपल्या सहकार्याशिवाय आमचा हा प्रवास शक्य नाही याची पक्की जाणीव माझ्या मनाशी सदैव आहेच. वर म्हटल्याप्रमाणेच नवोदित आणि दिग्गजांना एकाच विचारमंचावर आणणारा हा **'मराठी भाषा व साहित्य-संशोधन विशेषांक '** हा पुन:श्च आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटविणारा ठरेल व चोखंदळ वाचकांच्या पसंतीस पात्र ठरेल या खात्रीसह आणि पुन्हा भेटण्याच्या वायद्यावर आपली इथे रजा घेतो !

**धन्यवाद !!!**

**- प्रा. धनराज धनगर**

